महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग

# विभागीय आयुक्त ,कोकण विभाग यांचे कार्यालय

कोकण भवनसीबीडी बेलापू ,र, नवी मुंबई- ४००६१४
❖सामान्य शाखा❖ दुरध्वनी क्र : ०२२-२७५७१५०१❖ ❖ई-मेलgbkonkan@gmail.com❖

## : जाहीर सूचना:

विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय
कोकण भवन, नवी मुंबई ४००६१४

उप आयुक्त (पुनर्वसन), कोकण विभाग यांचे निर्लेखित केलेले जुने वाहन क्र. MH४३ G ३०० स्विफ्ट डिझायर चे दरपत्रक मागवून लिलाव करावयाचे आहे.

त्याबाबत सविस्तर अटी व शर्ती विभागीय आयुक्त,कोकण भवन यांचे संकेत https://divcomkonkan.gov.in स्थळावर दिनांक ०९.०९.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

| लिलाव प्रक्रियेने विक्री कार्यक्रम | | | |
|---|---|---|---|
| | | दिनांक | वेळ |
| १. | प्रसिध्दीचा दिनांक | ०९.०९.२०२४ | सकाळी १०.०० पासून |
| २. | दरपत्रक फॉर्म,कागदपत्रे सादर करणे व वाहन पाहणे. | ०९.०९.२०२४ ते १९.०९.२०२४ | सकाळी १०.०० पासुन ते सायंकाळी ४.०० पर्यंत |
| १. | दरपत्रक फॉर्म,कागदपत्रे धानकर्ष स्विकारणे व वाहन पाहणे शेवटचा दिनांक . | १९.०९.२०२४ | सकाळी १०.०० पासुन ते सायंकाळी ४.०० पर्यंत |
| २. | प्राप्त दरपत्रक उघडणे व अंतिम बोली लावणे. | २०.०९.२०२४ | सकाळी ११. ३० वा. |

कोणतेही दरपत्रक कारण न देता स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा तसेच त्यामध्ये कोणताही फेरबदल/सुधारणा करण्याचा संपूर्ण अधिकार , उप आयुक्त (सामान्य प्रशासन), कोकण विभाग यांनी राखून ठेवला आहे. ज्या संस्थाना/व्यक्तींना सर्व अटी व शर्ती मान्य असतील. अशा संस्थांनी /व्यक्तींनी वरील कालावधीत प्रत्यक्ष वाहनाची पाहणी करून लिलाव प्रक्रियेअंतर्गत दरपत्रक सादर करण्यामध्ये भाग घ्यावयाचा आहे.

06/09

(संजीव पलांडे)
उप आयुक्त (सा.प्र.) कोकण
विभाग

## दरपत्रक / निविदा अटी व शर्ती

१. लिलावाची प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर संपूर्ण रक्कम भरणा केल्यानंतरच निर्लेखीत वाहन ताब्यात देण्यात येईल.

२. सदरचे वाहन विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई येथील जवळ असलेल्या अल्पबचत धाम प्रांगणात ठेवण्यात आले आहे. त्यानुसार दिनांक ०९.०९.२०२४ ते १९.०९.२०२४ या कालावधीत दररोज सकाळी १०.०० ते दुपारी ०४.०० वाजेपर्यंत वाहनाची प्रत्यक्ष पाहणी करून जास्तीत जास्त दर नमूद करावेत. वाहनाची सद्यस्थिती पाहिल्याशिवाय लिलावात भाग घेऊ नये अन्यथा नंतर कोणतीही तक्रार अथवा सबब स्विकारली जाणार नाही.

३. निर्लेखीत विक्री करण्यात यावयाच्या वाहनाची अंदाजित बोली कमीत-कमी रक्कम रु. २०,०००/- इतकी आहे. सदर रकमेवर वाढीव बोली रक्कम रु. १,०००/- च्या पटीत असेल. (वाढीव बोली रकमेत फेरबदल करण्याचे अधिकार या कार्यालयाने राखून ठेवले आहेत.)

४. दरपत्रक / निविदा फॉर्म या कार्यालयातून प्राप्त करुन घेता येईल.

५. इसारा रक्कम (EMD) रु. ५,०००/- इतकी असून सदर रकमेचा रोख/ राष्ट्रीयीकृत बँकेचा धनाकर्ष COMMISSIONER KONKAN DIVISION या नावाने ०९.०९.२०२४ ते १९.०९.२०२४ पर्यंत दुपारी ०४.०० या कार्यालयात जमा करावयाचा आहे.

६. खालील कागदपत्रे दिनांक ०९.०९.२०२४ ते १९.०९.२०२४ दरपत्रक / निविदे सोबत जमा करणे अनिवार्य आहे. निविदा नमुना प्रपत्र "अ", आधार कार्ड व पॅनकार्डची प्रत, दरपत्रक / निविदा अटी व शर्तीच्या प्रतीवर साक्षांकित करण्यात यावे. (सही व शिक्यानिशी)

७. वरील ६ मध्ये नमुद कागदपत्रांची मुद्रीत स्वरुपातील (print) स्वयंसाक्षांकित (self attested) करून दिनांक १९.०९.२०२४ पर्यंत (स्वतंत्र लिफाफ्यात) दुपारी ०४.०० वाजेपर्यंत विभागीय आयुक्त कार्यालयात जमा करणे आवश्यक राहील.

८. ज्या संस्थेची / व्यक्तीची लिलाव विक्रीची उच्चतम बोली स्विकारण्यात येईल त्या संस्थेने / व्यक्तीने विभागीय आयुक्त,कोकण विभाग कार्यालयाकडे उर्वरीत रक्कम एकरकमी राष्ट्रीयीकृत बँकेचा धनाकर्ष (Demand Draft) COMMISSIONER KONKAN DIVISION कार्यादेश दिल्यापासून २ दिवसाच्या आत भरणे अनिवार्य आहे. संस्था व्यक्ती रक्कम कार्यालयाकडे वेळेत जमा करण्यास असमर्थ ठरल्यास त्याला अपात्र ठरवून त्याची इसारा रक्कम जप्त करण्यात येईल.

९. निर्लेखित वाहन लिलाव रकमेचा एकरकमी भरणा केल्यानंतर पुढील ७२ तासांच्या आत विक्री केलेले वाहन स्वखर्चाने विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई कार्यालयाच्या आवारातुन उचलून नेणे आवश्यक आहे.

१०. लिलावाने विक्री करावयाचे वाहन जेथे आहे व ज्या अवस्थेमध्ये आहे त्या अवस्थेमध्ये ताब्यात घ्यावे लागेल, वाहनाच्या अवस्थेमध्ये कोणताही बदल विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई कार्यालयाकडून केला जाणार नाही.

११. प्रादेशिक परिवहन कार्यालयाशी संबंधित सदर वाहनाचा कोणताही खर्च सदर संस्थेस/व्यक्तीस करावा लागेल, हे कार्यालय याबाबतचा कोणताही खर्च करणार नाही. तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालयाशी संबंधित आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता देखील संबंधित व्यक्ती / संस्थेनेच करावयाची आहे.

१२. विक्री केलेले वाहन कार्यालयाच्या आवारातून नेणेचे कार्यवाही दरम्यान संपुर्ण व सर्व प्रकारचा खर्च ठेकेदारास स्वखर्चाने करावा लागेल, त्याबाबत कोणताही खर्च कार्यालयाकडून केला जाणार नाही.

१३. ठेका मंजूर केलेल्या संस्थेने वाहन उचलण्याचे काम कार्यालयीन वेळेत म्हणजे सकाळी ११.०० ते सायंकाळी ०४.०० पर्यंत साप्ताहिक / सार्वजनिक सुट्या वगळून कामकाजाच्या दिवशी करावयाचे आहे.

१४.लिलावाने विक्री केलेले वाहन कंत्राटदाराने ताब्यात घेतल्यानंतर कार्यालयाच्या आवाराबाहेर नेताना कार्यालयाच्या इमारतीचे / आवारातील कोणत्याही साहित्याचे कोणतेही नुकसान झाल्यास त्याची भरपाई ठेकेदाराकडून त्याच ठिकाणी (on the spot) रोखीच्या स्वरुपात वसुल करण्यात येईल व याबाबत ठेकेदारास बाजू मांडण्याची कोणतीही संधी दिली जाणार नाही.

१५. निविदा कोणतेही कारण न देता स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा तसेच लिलावाची कार्यवाही कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचा अथवा त्यामध्ये कोणताही फेरबदल / सुचना करण्याचा संपूर्ण अधिकार उप आयुक्त (सामान्य प्रशासन),विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण भवन, कोकण विभाग यांनी राखून ठेवला आहे. तसेच याबाबत कोणतीही कारणीमिमांसा केली जाणार नाही.

* विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण भवन यांचे अधिनस्त उप आयुक्त ,(पुनर्वसन) कोकण विभाग यांचे जुने व निर्लेखन झालेले वाहन यांच्या दरपत्रक/निवदा सूचनेमध्ये नमूद केलेल्या वरील सर्व अटी/शर्ती मला पुर्णपणे मान्य आहेत. तसेच सदर अटी आणि शर्तीबाबत माझी कोणतीही तक्रार किंवा हरकत असणार नाही.

नाव:- ______________________________ स्वाक्षरी व संस्थेचा रबरी शिक्का-______________

ठिकाण:-

दिनांक:-